ॲड. अनिल साखरे, विशेष समुपदेशी यांना शासकीय विधी विषयक कामकाजाबाबत सेवाशुल्क (वकील फी) अदा करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,
शासन आदेश क्रमांक: न्यायाप्र-२३२५/ प्र.क्र.०४/व्यशि-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
२ रा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत), मुंबई -४०००३२
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२६.

वाचा:- (१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि. ११/०८/२०२६
(२) विधी व न्याय विभागाचे पत्र क्र. ३४४-२०२५/ई, दि. ०२/०७/२०२५
(३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई) यांचे पत्र क्रमांक: व्यशिप्र-२०२६/आस्था-४/कोर्टफी/श्री. अनिल साखरे/का-४/८९, दि.१३/०७/२०२६.

ज्ञापन :

संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संदर्भ क्र. (३) येथील पत्राच्या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, येथील मूळ अर्ज क्र. ४८१/२०२३ (श्री आर. बी मोटे व इतर) तसेच इतर ११ मूळ अर्ज प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि. २७/००३/२०२५ रोजी दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्र.९९४०/२०२५ (रिट याचिका (स्टॅम्प) क्र.२०४७६/२०२५) (महाराष्ट्र शासन व इतर वि. श्री. आर. बी. मोटे व इतर) व तद्नंतर रिट याचिका क्र. १७५३५/२०२५ अपील दाखल करण्यात आले. सदर न्यायालयीन प्रकरणी ॲड. अनिल साखरे यांची विधी व न्याय विभागाच्या संदर्भ क्र. (२) येथील पत्रांन्वये शासनाची बाजु मांडण्याकरीता विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे ॲड. अनिल साखरे यांनी शासनाची बाजू मांडलेली आहे. सदर न्यायालयीन प्रकरणी अद्यापपर्यंत ६ सुनावण्या झाल्या असून प्रत्येक सुनावणीकरीता रू. ३.०० लाख याप्रमाणे एकूण रू. १८.०० लाख चे सेवा शुल्क देयक अदा करण्याबाबत ॲड. अनिल साखरे यांनी विनंती केली आहे. त्या अनुषंगाने ॲड. साखरे यांना सेवा शुल्क (वकील फी) म्हणून एकूण रु. १८,००,०००/- (रुपये अठरा लक्ष फक्त) इतकी रक्कम अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणी येणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात "मागणी क्र. झेड ए ०२, २२३० कामगार व सेवायोजन, (००३) प्रशिक्षण, (०२) कारागिरांचे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण, (०२) (०१)

कारागिरांचे तांत्रिक व्यावसायिक प्रशिक्षण दत्तमत्त २२३० ए०३१ या प्रधान लेखाशिर्षाखालील (२८) व्यावसायिक सेवा" या उद्दिष्टांतर्गत भागविण्यात यावा.

३. प्रस्तुत ज्ञापन वित्त विभाग, शासन निर्णय दि. ११/०८/२०२६ नुसार वित्तीय अधिकार नियमपुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-दोन, अ. क्र. ६४, नियम क्र. १६६ "अ" अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे. त्याचा संगणक सांकेतांक २०२६१११७१७३४४८९४०३ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRADEEP SAHEBRAO SHIVTARE

Digitally signed by PRADEEP SAHEBRAO SHIVTARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=BE7F8A656A063523ECDBAC5E75130D8B7A4674A77A2691E4BF21582D392883E9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=415BAA8242ED5D99644FE1533246B0A85DC3D52848FB6CE23F47DAF8D647AE5A, cn=PRADEEP SAHEBRAO SHIVTARE
Date: 2026.11.17 17:35:37 +05'30'

(प्रदीप सा. शिवतरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ मुंबई/नागपूर, (लेखापरीक्षा/लेखाअनुज्ञेयता)

३) अवर सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

४) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पू), मुंबई-५१

५) निवडनस्ती (व्यशि-१)